ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

(9) Dr. Kailas Sawant
(History)



## SPECIAL ISSUE : V
## FEBRUARY - 2021

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT | LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Editor
Professor Dr.Sadashiv H. Sarkate

201

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**• Mailing Address •**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

202

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Creation Of Khalsa : A True Illustration Of Guru Govind Singh's Progressive Spirit | Dr. Aneesa Iqbal Sabir | 1-7 |
| 2 | Role of NGOs in watershed development in Upper Man River Basin: A case study Of Man Deshi Foundation | Dr.Patil A.S.<br>Shri.Bandgar G. D. | 8-13 |
| 3 | Women Self-Help-Group And Micro-Entrepreneurship | Asst. Prof. Dr. (Mrs.) Clementine Julius Rebello | 14-18 |
| 4 | Impacts Of Covid 19 On Various Sectors And Rebooting The Economy Post-Lockdown | Dr. R. S. Salunkhe | 19-23 |
| 5 | Literacy Region in Beed District of Maharashtra State | Dr. Jitendra V. Ghodake | 24-27 |
| 6 | Kamala Markandaya and Indian Diaspora | Dr. S. S.Sasane | 28-31 |
| 7 | An Analytical Study of Cropping pattern and Operational Land Holding in Marathwada Region of Maharashtra | Dr.Landge Balwant Bhimrao | 32-36 |
| 8 | Social Change And TheVoccumIn The Production Of Literature | Pawar Sharad Subhashrao<br>Dr. Swapna C. Vyawahare | 37-40 |
| 9 | Covid-19 And Current Educational Scenario In India | Smt. Sradhanjali Swain | 41-47 |
| 10 | संत तुकारामांच्या अभंगातील समतेचा संदेश | प्रा.डॉ.बी.आर.दहिफळे | 48-51 |
| 11 | सुरेश शिंगटे यांच्या कादंब–तील कृषी जाणिवा | बनकर माणिक नामदेव | 52-56 |
| 12 | प्रभाकर पेंढारकर यांच्या 'रारंगढांग' या कादंबरीतील व्यक्तिचित्रण (भाग दोन) | डॉ.चंद्रकांत रुंद्राक्ष | 57-62 |
| 13 | मुक्ता साळवे यांच्या निबंधातील वाङ्मयीन विशेष | डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे | 63-68 |
| 14 | सुगावा मासिकाचेकार्य : एक अभ्यास | दीपक हरिदास कांबळे | 69-73 |
| 15 | मुक्या जीवांची कैफियत म्हणजे वृषभसूक्त | प्रा.डॉ.गजानन जाधव | 74-76 |
| 16 | १९८० नंतरची आदिवासी कविता | प्रा. के. आर. आढाव | 77-81 |
| 17 | लीळाचरित्रातील व्यक्तिचित्रण | नवनाथ किसन गुंड | 82-87 |
| 18 | लोकसाहित्य परंपरा एक अभ्यास' | प्रा.डॉ.निवृत्ती विनायक मिसाळ | 88-89 |
| 19 | सामाजिक भाषाविज्ञान : संकल्पना व स्वरुप | डॉ.प्रतीक्षा गायकवाड | 90-94 |
| 20 | अशोक कोळी यांच्या कादंबरीतील बंडखोर पुरूषपात्र : इसादास | प्रा.डॉ.राजीव वैजनाथराव यशवंते | 95-98 |
| 21 | मध्ययुगीन मराठी साहित्याची विविध प्रसारमाध्यमे | प्रा. डॉ. राकेश दे. कभे | 99-102 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरविषयक चरित्रात्मक कादंबऱ्यांचे स्वरूप | संजीव शिवाजी कांबळे | 103-107 |
| 23 | 'आदिवासी वीरनायक तंट्या भिल्ल' | प्रा.डॉ. सुभाष निवृत्ती शेकडे | 108-110 |
| 24 | अण्णा भाऊ साठे यांची साहित्य व कलाविषयक भूमीका | प्रा. डॉ. सुनिल संभाजी साठे | 111-114 |
| 25 | १९७५ ते १९९० या कालखंडातील ग्रामीण कादंबरी | प्रा.डॉ.राजेंद्र वडमारे | 115-121 |

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | साहित्यिक गो. नी. दांडेकर यांचा जीवनप्रवास | सुप्रिया राजाराम गांवकर | 122-126 |
| 27 | मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती : जागतिकीकरणाच्या संदर्भात | प्रा.भरतकुमार भागाजी भालेराव | 127-131 |
| 28 | अमृता प्रीतम के 'पिंजर' उपन्यास में नारी चित्रण | अर्चना कडूबा पालकर | 132-134 |
| 29 | अधुरे देह की त्रासदी: किन्नर कथा | प्रा.डॉ.बाबासाहेब भुजाडे | 135-140 |
| 30 | संत तुलसीदास की प्रासंगिकता | डॉ. विष्णु गव्हाणे | 141-144 |
| 31 | ``महादेवी वर्मा और छायावाद`` | प्रा.खाडे विद्या बाबूराव | 145-147 |
| 32 | अलका सरावगी के कहानी संग्रह : दूसरी कहानी में वर्णित नारी | प्रीती अहिर | 148-152 |
| 33 | हरिवंशराय बच्चन के काव्य में प्रतीकात्मकता | डॉ.सिध्देश्वर विठ्ठल गायकवाड | 153-156 |
| 34 | संत तुकाराम का विद्रोह | डॉ. टाळके ए. बी. | 157-162 |
| 35 | सामाजिक कार्यकर्ता और समाज में अच्छा परिवर्तन करन में उसकी भूमिका | शिंदे प्रशांत हाबु | 163-167 |
| 36 | वृद्धावस्था : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. दिलीप कुमार सोनी | 168-174 |
| 37 | शितयुध्द कालखंड मे संयुक्त राष्ट्रसंघ की सफलता,असफलता एक परिक्षण | डॉ.सूर्यकांत माधवराव सांभाळकर | 175-180 |
| 38 | संत रविदास यांचे स्त्रीमुक्ती विषयी विचार | प्रा.चव्हाण आर.ए. | 181-183 |
| 39 | महात्मा बसवण्णाच्या समतेच्या लढयातील पहिले बलिदान : वीरशरण हरळय्या | प्रा.डॉ.दत्ता पिलाप्पा हिंगमिरे | 184-187 |
| 40 | मराठेकालीन जमीन महसूल पध्दती एक अभ्यास | डॉ.देवकाते बी.एन. | 188-194 |
| 41 | छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेचे किंवा शासनव्यवस्थेचे मूल्यमापन | प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर | 195-200 |
| 42 | सेनापती उमाबाई दाभाडे जीवन आणि कार्य | डॉ.सावंत के.डी. | 201-204 |
| 43 | कालखंडानुसार मोहोळ तालुक्याच्या इतिहासाचा | डॉ. सज्जन उध्दव पवार | 205-208 |
| 44 | आदिवासी कोकणीसमाजातील समाजसुधारक : श्री. बी. एस.कोकणी | डॉ. शशीकांत गोकुळ साबळे | 209-212 |
| 45 | "लोकराजा राजर्षी शाहू महाराजांचे लोकोध्दारक कार्य" | प्रा.डॉ.सुनिल रजपूत | 213-215 |
| 46 | प्रशासक हा तत्त्वज्ञ का असायला पाहिजे? (Why the Administrator Should be Philosopher) | चंद्रकांत प्रल्हाद सोनवणे | 216-220 |
| 47 | कृषी क्षेत्रातील राजर्षी शाहू महाराज यांचे | प्रा.डॉ.व्यंकटेश काळूराम मदनुरे | 221-223 |
| 48 | शिवकालीन ग्रामीण अर्थकारण | डॉ.मुळे नंदकिशोर कृष्णराव | 224-227 |
| 49 | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान : शेतकरी आत्महत्या | गजानन संभाजी फुपाटे | 228-233 |
| 50 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे आर्थिक विचार | प्रा.सुनिल मिरासे | 234-237 |
| 51 | कोरोना कालखंड आणि भारतीय महिलांची स्थिती | डॉ.प्रा.चांगदेव निवृत्ती मुंढे | 238-241 |
| 52 | शिवकालीन अष्टप्रधान मंडळ व प्रशासन व्यवस्था | डॉ.ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे | 242-245 |
| 53 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कृषिविषयक दृष्टिकोन एक भौगोलिक अभ्यास | प्रा.कांबळे दयानंद सखाराम | 246-249 |

# सेनापती उमाबाई दाभाडे जीवन आणि कार्य

**डॉ.सावंत के.डी.**
(इतिहास विभाग प्रमुख)
महिला कला महाविद्यालय, गेवराई

**प्रस्तावना :**

ऐतिहासिक दप्तरातून मराठा घराण्यातील स्त्रियांची कितीतरी पत्रे उपलब्ध आहेत. त्यावरुन मराठा घराण्यातील स्त्रीया चांगल्या शिकलेल्या आणि प्रशासनाची, युध्द कलेची आणि राजकारणाची जाण असलेल्या होत्या. हे त्यांची प्रत्यक्ष पत्रे वाचल्यानंतर लक्षात येते. यावरुन मराठा घराण्यातील स्त्रीया ज़ातीने राजकारणात, युध्दकारणात, प्रशासनात आणि धर्मकारणात भाग घेत असत. तसेच त्यांच्या पत्रव्यवहारावरुन बाह्य परिस्थितीबद्दल मराठा घराण्यातील स्त्रीया ह्या किती जागरुक आहेत याचे प्रत्यंतर सेनापती उमाबाई दाभाडेच्या कार्य व कर्तबगारीमुळे लक्षात येते.

तत्कालीन स्त्री वर्गाचा विचार केला असता, मराठा राजघराण्यातील आणि मराठा सरदार घराण्यातील स्त्रियांना परंपरांगत पध्दतीने शिक्षण प्राप्त होत असे. त्याचप्रमाणे काही स्त्रियांना युध्दकला व प्रशासन यांचे शिक्षण मिळत असते. संधी मिळताच या क्षेत्रातही स्त्रिया प्राविण्य मिळवित असत. भोसले घराण्यातील ताराबाई आणि जिजाबाई (कोल्हापूर) ह्या राजघराण्यातील स्त्रिया आणि त्याचप्रमाणे मराठा सरदार घराण्यातील सेनापती उमाबाई दाभाडे, अहिल्याबाई होळकर, लक्ष्मीबाई शिंदे (महादजी शिंदेची पत्नी) या स्त्रियांनी राजकारण, प्रशासन, युध्दकलेत फार मोठा लौकीक प्राप्त केलेला दिसतो. असे काही अपवाद वगळता सर्वसामान्य स्त्रियांची स्थिती अशिक्षितच किंबहूना निरक्षरच होती. जेथे स्त्रियांना सामाजिक क्षेत्रातील किमान स्वातंत्र्य देण्यास पुरुष प्रधान समाज स्वातंत्र्य देण्यास उदार नव्हता. तेथे त्यांचा राजकारणाशी संबंध कसा येणार? मराठा समाजात बालविवाह आणि बहुपत्नीत्व पध्दती त्या काळात रुढ असलेल्या दिसतात. मराठा समाज हा शेती बरोबरच लष्करी पेशात नोकरीला असल्यामुळे त्यांच्या घराण्यातील मुले व मुलींना स्वसंरक्षणापुरते, किमान अक्षर ओळख आणि लष्करी शिक्षण सारखेच दिले जात असे, कोणताही भेदभाव केला जात नसल्याचे दिसते. मुलीच्या शिक्षणाचा विकास विवाहानंतर पतिच्या घराण्याच्या सहवासातून आणि अनुभवातून साहजिकच घडून येत असलेला दिसतो. अपघातातून नाईलाजाने अथवा एक जबाबदारी म्हणून राजघराण्यातील आणि सरदार घराण्यातील स्त्रियांना राज्यकारभाराची धूरा सांभाळण्याची संधी मिळाली असता त्यांनी त्यामध्ये चांगलाच लौकिक संपादन केलेला दिसतो. १८ व्या शतकातील अशा मराठा घराण्यातील स्त्रियांच्या मालिकेतील महाराणी ताराबाई, कोल्हापूरची जिजाबाई, अहिल्याबाई होळकर, लक्ष्मीबाई शिंदे आणि सेनापती उमाबाई दाभाडे ह्या त्या भाग्यवान स्त्रिया होत. इतर स्त्रियांच्या म्हणजे सर्वसामान्य स्त्रिवर्गाचा मात्र राजकारणाशी आणि युध्द कारणाशी काडीचाही संबंध नव्हता. विशेषतः सेनापती उमाबाई दाभाडे यांचे राजकारणातील, युध्दकारणातील, समाजकारणातील, प्रशासनातील आणि धर्मकारणातील स्थान हे सर्व श्रेष्ठ होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशा या कर्तबगार सेनापती उमाबाई दाभाडे यांया जीवन व कार्यांचा अभ्यास समाजापुढे यावा हा या संशोधन पेपरचा उद्देश आहे.

**उमाबाई दाभाडे यांचे प्रारंभिक जीवन :**

उमाबाई यांचा जन्म नाशिकच्या अभोणा देवराव ठोके देशमुख लष्करी पेशाच्या घरंदाज लढाऊ मराठा कुटूंबात झाला. मराठा लष्करी पेशाच्या घराण्यातील तत्कालीन रुढी परंपरेने बालबोध लिहिण्या वाचण्याबरोबर युध्द कलेचे शिक्षण त्यांना बालपणीच मुलांच्या बरोबरीने प्राप्त झालेले दिसते. घोडयावर बसून रपेट करणे, शस्त्रे चालविणे अर्थात युध्दकलेची जाणीव बालवयातच त्यांना पित्याकडून प्राप्त होणे साहजिकच आहे. उमाबाईचा विवाह मराठी साम्राजाच्या सेनापती खंडेराव दाभाडे यांच्याबरोबरच इ.स.१७०४ मध्ये झालेला दिसते, उमाबाई ही खंडेराव दाभाडेची तिसज्या नंबरची पत्नी होय. उमाबाई आणि खंडेराव यांच्या विवाहापासून तळेगावचे दाभाडे (ता.मावळ जि.पुणे) आणि अभोणेकर ठोके पाटील (बागलान त.कळवण) यांच्या घराण्यांचा संबंध प्रस्थापित झाल्याचे दिसते. तळेगावकर दाभाडे घराणे हे सेनापतीचे घराणे म्हणून इतिहास प्रसिध्द आहे. हा सेनापतीचा अधिकार ह्या घराण्यात खंडेराव ह्या पुरुषापासून प्रथम सुरु झाला. दि.१७ नोव्हेंबर १७१३ मध्ये छत्रपती शाहूने खंडेराव दाभाडेला 'सेनाखास खेल' या पदावर नियुक्त केले. इ.स.१७१६ पर्यंत तो याच पदावर कार्यरत होते. त्यानंतर दि.११ जानेवारी १७१७ मध्ये खंडेराव दाभाडे यांना छत्रपती शाहूने मराठा सामाज्याचा सेनापती म्हणून नियुक्त केले.[१]

सेनापती खंडेराव दाभाडेंनी उत्तर सरहद्दीवर राहून खानदेश, वऱ्हाड व गुजरात या तीन ही प्रातांवर आपली पकड घट्ट केली. पेशवा बाजीरावने आपल्या महत्त्वकांक्षेच्या हेतूपुर्तीसाठी गुजरातच्या सुभ्यास हस्तक्षेप करुन इ.स.१७२६ मध्ये निम्मे गुजरातचा मोकासा आपला बंधु जिमाजीच्या नावाने छत्रपती शाहूकडून करुन घेतला. त्यामुळे सेनापती खंडेराव दाभाडे नाराज झाले आणि पेशवा बाजीरावबरोबर तुटकपणे वागू लागले. तेंव्हा पेशवा बाजीरावने सेनापतीच्या विरुध्द कांगळ्या करुन छत्रपतीचे मन सेनापती विषयी कुलशित केले. छत्रपती शाहूने सेनापती खंडेराव दाभाडे यांची कानउघडणी केली आणि तंबी ही दिली. त्यामुळे सेनापती खंडेराव दाभाडेवर नाकर्तेपणाचा आरोप केला जातो. सेनापती खंडेराव दाभाडेंना पोटशूळाच्या व्यथेमुळे सेनापतीपदाची कर्तव्य पार पाडणे कठीण होऊन बसले होते. याची जाणीव छत्रपती शाहूंना होती. त्यामुळे शेवटच्या पाच-सहा वर्षाच्या काळात खंडेरावची पत्नी उमाबाई, पुत्र त्र्यंबकराव आणि दाभाड्यांचा गुजरातमधील हस्तक पिलाजी गायकवाड हे मुख्त्यारीने सेनापतीचा कारभार सांभाळत होते. पेशवा बाजीरावने गुजरातचा निम्मा मोकासा बळकावल्यामुळे तो नाराज होता. त्यांनी छत्रपती शाहूकडे तक्रार करुन आपली नाराजी व्यक्त केली. इ.स.१७२७ मध्ये चिमाजीच्या नावे दिलेला गुजरातचा निम्मा मोकासा दूर करुन तो पुन्हा सेनापती खंडेरावांना देऊन त्यांच्यात सुलुख घडवून आणला. पण तो सुलुख जास्त काळ टिकला नाही. दि.८ जानेवारी १७३० रोजी सेनापती खंडेराव दाभाडेचे मुतखडयाच्या विकाराने निधन झाले. या खंडेराव दाभाडेच्या निधनामुळे दाभाडे घराणे कमकुवत झाले. याचा फाया पेशवा बाजीरावने आपला बंधू चिमाजी आप्पा याला गुजरातवर पाठवून गुजरातचा सुभेदार सरबुलंदखानचा पराभव केला व त्याच्याशी करार करुन गुजरातचा मोकासा छत्रपतीच्या नावे लिहून घेतला आणि त्या मोबदल्यात मोगलांच्या गुजरातमधील सरंक्षणाची हमी घेतली. आणि त्यानंतर गुजरातचा निम्मे मोकासा छत्रपतीकडून आपल्या नावे करुन घेतला. पेशवा बाजीरावने गुजरातमध्ये केलेला हस्तक्षेप उमाबाई आणि सेनापती त्र्यंबकराव दाभाडे यांना मान्य नव्हता. आपल्यावर छत्रपती शाहूने केलेला अन्याय दूर करण्याचा सेनापती त्र्यंबकराव दाभाडे यांनी आपल्या

मनाशी ठाम निश्चय केला. उमाबाई दाभाडे व कंठाजी निजाम उलमुल्ककडे मदत घेण्यासाठी गेलेली दिसतात.[२] निजाम उलमुल्कने मदत देण्याचे अभिवचन दिल्याचे दिसते. त्यामुळे पेशवे बाजीराव पहिले आणि त्र्यंबकराव दाभाडे यांच्यात संघर्ष अटळ ठरला.

सेनापती त्र्यंबकराव दाभाडे यांच्याबद्दलच्या अनेक तक्रारी कानी आल्यावरुन छत्रपती शाहूने सेनापती त्र्यंबकराव दाभाडे यास हुजूर दर्शनास आणण्यास हुजरे पाठविले.[३] यावेळी सेनापती त्र्यंबकराव दाभाडे छत्रपती शाहूच्या भेटीस गेलेले नाहीत. पुढे उत्तरोत्तर सेनापती त्र्यंबकराव दाभाडे व उमाबाई यांचे सुत्र निजाम उलमुल्ककडे लागल्याचे दिसते. या सर्व गोष्टी छत्रपती शाहूच्या कानी आल्यावर छत्रपती शाहू संतापले व त्यांनी पेशवा बाजीराव यास आज्ञा केली की, सेनापती त्र्यंबकराव दाभाडे यास आमच्या दर्शनास आणा. त्या आज्ञाप्रमाणे पेशवा बाजीराव गुजरामध्ये गेला असता बडोदयानजीक डभई येथे दि.१ एप्रिल १७३१ रोजी उभयता सैन्यासह समोरासमोर आले. बोलाचाली व वाटाघाटी सुरु होत्या. पण शेवटी युध्द झाले व त्यांत सेनापती त्र्यंबकराव दाभाडे यास अचानक गोळी लागून तो ठार झाला.[४]

**उमाबाई दाभाडे यांचे सेनापती म्हणून कार्य :**

'डभई' च्या युध्दानंतर छत्रपती शाहूंनी पेशवा बाजीरावला शिक्षा न करता सरंक्षण देवून आपल्या पाठिशी घातले. त्यामुळे छत्रपती शाहूशी एकनिष्ठ आणि आज्ञाधारक सेनापती उमाबाई दाभाडे यांचा नाईलाज झाला. गुजरातचा मोकासा पुन्हा दाभाडयांना देऊन आणि गुजरामध्ये यापुढे पेशवा बाजीरावने हस्तक्षेप करु नये असे वचन पेशवा बाजीरावकडून घेऊन छत्रपती शाहूने पेशवे बाजीराव पाहिले आणि सेनापती उमाबाई दाभाडे यांच्यात स्नेहपूर्ण समझोता घडवून आणला. केवळ छत्रपती शाहूंची मर्जी सांभाळण्याकरीता सेनापती उमाबाई दाभाडे यांनी या कराराला मान्यता दिली. पण सेनापती उमाबाईच्या मनातील राग मात्र शांत झालेला नव्हता. सेनापती उमाबाई दाभाडे यांनी छत्रपती शाहूच्या आज्ञेचा आदर करुन छत्रपती शाहूशी असलेली निष्ठा ढळू दिली नाही.

सेनापती उमाबाई दाभाडे यांचा अतुल पराक्रम हे जसे वैशिष्ट्ये होते. तसेच व्यवहार कौशल्य हा तिच्या असामान्य व्यक्तीमत्वाचा दुसरा पैलू म्हणता येईल. सेनापती उमाबाई दाभाडेचा थोरला मुलगा त्र्यंबकराव हा डभईच्या युध्दात मारला गेला. त्यांची दोन्ही मुले लहान असतांना त्यांनी आपल्या घराण्याकडे सेनापती आणि सेवाखासखेल या पदाचा अधिकार कायम राखला. सेनापती हे पद यशवंतरावला आणि सेनाखासखेल हे पद सवाई बाबुराव यांच्या नावे छत्रपती शाहूकडून मिळवून घेतली. यात सेनापती उमाबाई दाभाडे यांचे व्यवहार चातुर्य लक्षात येते. अल्पवयीन मुलांचे पालक या नात्याने वरील दोन्ही पदाची मुख्त्यिार म्हणून सेनापती उमाबाई दाभाडे यांनी स्विकार केला. आणि त्याचबरोबर जातीने यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली. सेनापती उमाबाई दाभाडे यांनी आपले गुजरातचे वतन सांभाळण्याकरिता मोगलांच्या विरुध्द प्रखर लढा दिला. गुजरातवरील मोगलांचे वर्चस्व स्वबाहुबलावर नष्ट केले. त्यांच्यासमोर अहमदाबाचा ठाणेदार जोरावरखान बाबीसारखा कडवा पठाण बहादूराचा टिकाव लागू शकला नाही. त्याला आपला जीव घेऊन पळून जावे लागले. सेनापती उमाबाई दाभाडे यांनी जोरावरखानच्या विरुध्द दिलेला संघर्ष आणि मिळविलेला विजय याला भारताच्या इतिहासात तोड नाही. सेनापती उमाबाई दाभाडेंनी जोरावरखानच्या विरुध्द मिळविलेला विजय हा गुजरातच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखे आहे. सेनापती उमाबाई दाभाडे यांचे पुत्र

यशवंतराव-सेनापती, आणि सवई बाबूराव-सेना खासखेल हे माता-पित्याप्रमाणे शूर आणि पराक्रमी होते. खुद हे दोघेही सेनापती उमाबाई दाभाडेच्या तालमीत युध्दक्षेत्रात आणि राजकारणात तरबेज झालेले होते. पेशवा बाजीरावच्या मृत्यूनंतर सेनापती उमाबाई दाभाडेचा पेशव्यावरील राग कमी झाला होता. परंतु पेशवा बालाजी बाजीरावरील सेनापती उमाबाई दाभाडे यांची नाराजी पुढे ही कायम राहिली. छत्रपती शाहूंच्या निधनानंतर दाभाडेंचा मुख्य आधार कोसळला. सेनापती उमाबाई दाभाडे, ताराबाई आणि दमाजी गायकवाड यांनी पेशवा बाळाजी बाजीरावच्या विरोधात उठाव केला. तेंव्हा दि.१६ मे १७५१ रोजी पेशवा बाळाजी बाजीराव यांनी दाभाडे घराण्यातील सर्व मंडळाना पुण्यात होळकरांच्या वाड्यात नजरकैदेत ठेवले . परंतु सेनापती उमाबाई दाभाडे यांनी पेशवा बाळाजी बाजीरावशी समझोता घडवून आणला व ते प्रकरण संपले. मात्र दरम्यानच्या काळात सेनापती उमाबाई दाभाडे यांनी पेशवा बाळाजी बाजीरावच्या विरोधात अक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसते. पेशवाईतील राजकारणाच्या रंगात सेनापती उमाबाईची पकड ही या काळात पहावयास मिळते. याच दरम्यान सेनापती उमबाईची तब्येत खालावली व दि.२९ नोव्हेंबर १७५३ रोजी त्यांचे पुण्यात निधन झाले. [५]

**सारांश :**

सेनापती उमाबाई दाभाडे ह्या कर्तृत्ववान स्त्री होत्या. त्यांनी सुरुवातीला पेशवा बाजीराव पहिले यांच्या प्रभावी शक्तीलाही झुंज देवून कार्य तत्परता दाखवल्याचे दिसते. पुढे पेशवे बाळाजी बाजीरावच्या काळातही सेनापती उमाबाई दाभाडे एक स्त्री असूनही कचरल्या नाहीत. पेशव्यांपुढे जीवनात कधीच मान झुकविली नाही. यातच त्यांचा तत्वनिष्ठ आणि जाज्वल स्वाभिमानाचा प्रत्यय येतो.

**संदर्भ सूची :**

१) त्रैमासिक भारत इतिहास संशोधक मंडळ, सेनापती दाभाडे दप्तर, भाग-१, वर्ष-३१ वे, अंक २-३, ऑक्टोबर १९५०- जानेवारी १९५१- पुणे, लेखन २६, पृष्ठ-२३

२) सरदेसाई गो.स.पेशवे दप्तर, भाग-१७, गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३१, लेखन ८, पृष्ठ ६,७

३) सरदेसाई गो.स.पेशवे दप्तर, भाग-१७, उपरोक्त, लेखन-२५,पृष्ठ ३०

४) राजवाडे वि.का. मराठायांच्या इतिहासाचे साधने, खंड-३, कोल्हापूर १९०१, लेखन ३०, पृष्ठ २७

५) राजवाडे वि.का., मराठवाड्यांच्या इतिहासाची साधने, खंड-६, उपरोक्त,पृष्ठ ९९.

◆◆◆